**सोबत** - महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे " **सेंटर ऑफ एक्सलन्स या योजने अंतर्गत दोन वर्षाचे प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना पदविका अभ्यासक्रमाच्या व्दितीय वर्षात प्रवेश देण्याबाबत** " या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक जाबॅप्र-२०१०/(८४/१०)/व्यशि -५ दिनांक ३ जुलै २०१० ची प्रत

**************************************************************************

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पोष्ट बॉक्स नं. २१९
सामनगांव रोड, नाशिक रोड ४२२ १०१

जा.क्र. तंशि/विकाना/तांशा /२०१०/
दिनाक - 6 JUL 2010

प्रत - माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था
नाशिक विभाग

(डॉ.आर.एस.नायडू)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत - प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक
२/- सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे

सेंटर ऑफ एक्सलन्स या योजने अंतर्गत दोन वर्षाचे प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना पदविका अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन परीपत्रक क्र.जाबॅप्र-२०१०/(८४/१०)/व्यशि-५

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०३ जुलै, २०१०.

## <u>प रि प त्र क</u>

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. क्र.जीटीबी १००५/(१८६/०९)/तांशि-५, दि.०२ जुलै २००९.

२) संचालक (प्रशिक्षण) यांचे पत्र क्र.२५/जाबॅप्र/२०१०/३००, दिनांक २१/०६/२०१०

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून दिले जाणारे कौशल्य प्रशिक्षण कारखान्यातील तंत्रज्ञानाच्या गरजेशी सुसंगत होण्यासाठी व कौशल्ययुक्त जागतिक दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी कारखाने / औद्योगिक संघटना यांच्या सहकार्याने देशातील एकूण ५०० औ.प्र.संस्थाचा दर्जा उंचावून त्यांना "सेंटर ऑफ एक्सलन्स" मध्ये रुपांतरीत करण्याची योजना केंद्र शासनामार्फत सन २००५ पासून सुरु करण्यांत आली आहे. बहुकौशल्ययुक्त कारागीर तयार करणे हे सेंटर ऑफ एक्सलन्स या योजनेचे उद्दिष्ट आहे.

संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णय क्र.जीटीबी १००५/(१८६/०९)/तांशि-५ दिनांक २ जुलै २००९ अन्वये आय.टी.आय. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना राज्यातील शासकीय / अशासकीय तंत्र निकेतनातील पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांवर कांही अटींच्या अधीन राहून थेट द्वितीय वर्षात प्रवेशासाठी आरक्षण ठेवण्यास मान्यता देण्यांत आली आहे. तथापी, सेंटर ऑफ एक्सलन्स या अभ्यासक्रमांतर्गत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना तंत्र निकेतनातील पदविका अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात रिक्त जागांवर प्रवेश मिळण्यांस अडचणी येत असल्याचे संदर्भ क्रमांक २ अन्वये शासनाच्या निदर्शनास आणण्यांत आले आहे.

केंद्र शासनाच्या "Project Implementation Plan" नुसार सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करण्यांत आलेल्या औ.प्र.संस्थामध्ये निवडण्यांत आलेल्या सेक्टरनुसार अभ्यासक्रम दोन वर्ष कालावधीचे आहेत. या अभ्यासक्रमांतर्गत ब्रॉड बेस बेसिक मोडयुलचे प्रशिक्षण ६ बेसिक मोडयुलव्दारे पहिल्या वर्षी देण्यांत येते. ब्रॉड बेस बेसिक मोडयुलचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यापुढील ६ महिन्यामध्ये ॲडव्हान्स मोडयुलचे प्रशिक्षण देण्यांत येते आणि ॲडव्हान्स मोडयुलचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर ६ महिन्याचे स्पेशलाईज्ड मोडयुलचे प्रशिक्षण आस्थापनेमार्फत देण्यांत येते. या एकूण दोन

वर्षाच्या कालावधीत केंद्र शासनाच्या सुचनेनुसार नियमितरित्या तीन परीक्षा घेतल्या जातात व या तिनही परीक्षेत उमेदवार उत्तीर्ण होणे आवश्यक असते. केंद्र शासनाने स्पष्ट केल्यानुसार सेंटर ऑफ एक्सलन्स हा अभ्यासक्रम २ वर्षाचा ठरतो. या अभ्यासक्रमांतर्गत तिन्ही परिक्षांच्या उत्तीर्ण गुणांची सरासरी ६० टक्के प्राप्त झालेले प्रशिक्षणार्थी त्यांच्या विहीत समकक्ष पदविका अभ्यासक्रमाच्या व्दितीय वर्षाच्या प्रवेशासाठी अनुज्ञेय असतील. सदर मान्यता शासन निर्णय क्र.जीटीबी १००५/(१८६/०९)/तांशि-५ दिनांक २ जुलै २००९ मधील प्रवेशासंबंधी अन्य अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून देण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.न.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई.
सहसंचालक / उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक [संचालक (प्रशिक्षण) यांच्यामार्फत]
सह संचालक, तंत्र शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये, [ संचालक (तंत्र शिक्षण )यांच्या मार्फत]
सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, [संचालक (प्रशिक्षण) यांच्यामार्फत]
मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, यांना माहीतीसाठी अग्रेषित.
मा.राज्यमंत्री, उच्च्व व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, यांना माहीतीसाठी अग्रेषित.
कार्यासन अधिकारी (व्यशि-१,२,३,४/तांशि-५), उच्च्व व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती / व्यशि-५